# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १४३-२३ दिनांक :- १०/०५/२०२३

**वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणा-या वेश्या दलालास अटक करुन २ पिडीत महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांची कारवाई.**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, विरार पोलीस ठाण्याचे हद्दीत गांधीचौक, फुलपाडा, विरार पुर्व येथे राहते घरामध्ये एक वेश्यादलाल वेश्यागमननाकरीता मुली पुरविणार आहे व त्याबदल्यात मोबदला स्विकारणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन स्टाफ, दोन पंच, बोगस गिऱ्हाईक यांचे सह वर नमुद ठिकाणी छापा कारवाई केली असता वेश्यादलाल परवीन प्रकाश यादव ही पिडीत महिला यांना पैशाचे आमिष दाखवुन त्याचेकडून वेगवेगळया ग्राहकांना वर नमुद ठिकाणी बोलावुन त्यांचेकडुन वेश्यागमनाकरीता महिलांना पुरवुन त्या बदल्यात गिऱ्हाईकाकडुन पैश्याच्या रुपात मोबदला स्विकारत असताना मिळुन आल्याने सदर वेश्या दलालास ताब्यात घेण्यात आले व दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली. नमूद महिला दलाला विरुध्द विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ४६८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७० (१)(३) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपाराच युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.हवा. बापु पवार, रोशन नारायण किणी, विनोद अशोक राऊत, म.पो.हवा. सुप्रिया नथू तिवले, म.पो.अम. १६१११ पुनम मधुकर जगदाळे, चालक पो.हवा. सुनिल विष्णु पागी, यांनी केली आहे.

-----oooo-----